**<u>नि.५ वर आदेश</u>**

**(पारीत दि. १२ नोव्हेंबर, २०२४)**

अर्जदार यांनी कौटूंबीक हिंसाचाराअंतर्गत अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज हिने तुर्तातुर्त खावटी मिळण्यासाठी केलेला आहे.

२. अर्जदार हीची केस थोडक्यात पुढील प्रमाणे– अर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे सदरचा अर्ज निकाली लागण्यास बराच कालवधी लागणार आहे. अर्जदार हिला कोणताही कामधंदा उपलब्ध नाही. गैरअर्जदार क्र.१ हा सिव्हील इंजिनीअर म्हणून महापालीकेत नोकरीत असून त्याला मोठा पगार मिळतो. तर त्याच्याकडे राहण्यासाठी एकुण दोन फलॅट मुंबई सारखया ठिकाणी उपलब्ध आहे. तर गैरअर्जदार क्र.२ व ४ यांची रजनी इंटरप्रायजर म्हणून कंपनी आहे. त्यामुळे ते गैरअर्जदार क्र.१ यांचेवर अवलंबून नाही. त्यामुळे अर्जदार हिला अर्ज प्रलंबीत असेपर्यंत तुर्तातुर्त खावटी मिळण्याविषयी विनंती केलेली आहे.

२. गैरअर्जदार यांनी आपले म्हणणे नि.१२ वर दाखल केलेले आहे. गैरअर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही तुर्तातुर्त खावटी मागण्यास अपात्र आहे. कारण सदर कारवाईला सर्वस्वी ती स्वतः जबाबदार आहे. अर्जदार ही कोणतेही कारण नसतांना गैरअर्जदार क्र.१ चे संमत्ती विना माहेरी निघून आली. स्वतः तिने गैरअर्जदार याचे सहमतीविना गर्भपात करवून घेतला. त्यानंतर तिने पुन्हा नांदायला येण्यास नकार दिला. तिने नोटीस दिली असता, गैरअर्जदार याने नांदायला येण्याविषयी कल्याण येथील दिवाणी

कोर्टात अर्ज दाखल केला. तेथे उपस्थीत झाल्यावर अर्जदार हिने, कटशह देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला असल्याचे दिसून येतो. गैरअर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे आर्थीक स्थीतीविषयी त्यांचा कोणताही वाद नाही. तसेच अर्जदार हिची आर्थीक परीस्थीती मजबूत असून निव्वळ गैरअर्जदारांना त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला असल्याचे म्हणलेले आहे.

३. अर्जदार यांचे विद्वान वकील डी टी मोटवाणी व गैरअर्जदार यांचे विद्वान वकिल निलम गुप्ता यांचा युक्तीवाद ऐकला व दोन्ही बाजूने सादर केलेले कागदपत्र पडताळून पाहील्यावर पुढील प्रमाणे गुण या अर्जाच्या कामी काढण्यात येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिला अंतरीम खावटी मिळण्यासारखी प्रथमदर्शनी ही केस आहे काय ? | **नाही.** |
| २ | काय हुकूम ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– का र ण मि मां सा –**

४. अर्जदार हिच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार हे तीला सतत त्रास देत असत, तसेच तिच्या चारीत्र्यावर संशय घेवनू वेगळा प्रकारे राबवत असत. त्यामुळे तिला माहेरी येवून राहावे लागले. तर गैरअर्जदार याने लेखी हमी दिल्यास तिची नांदायला जाण्याची तयारी असल्याचे तिने म्हणलेले आहे. गैरअर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे अर्जदार हिला नोकरी

करण्याची भारी हाउस होती. लग्नापुर्वी ती नोकरी करीत असल्याने प्रथम नोकरी सोडायची ईच्छा असल्यास लग्न करण्याचे तिने मान्य केलेले. असे असतांना ती स्वतःच्या नातेवाईकासोबत कोणतेही वाद नसतांना स्वतःला अपायकारक होईल अशा पध्दतीने प्रवास करुन माहेरी आली. तर त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याला कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता, अचानकपणे गर्भपात करुन घेतला. गैरअर्जदार क्र.१ याने वेळोवेळी किंवा नांदायला येण्याविषयी विनंती केली असता तिने नांदायला जाण्यास साफ नकार दिला. गैरअर्जदार क्र.१ याने त्यामुळे नांदायला येण्याविषयी कल्याण येथील न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला. त्या अर्जाच्या कामी उपस्थीत झाल्यावर अर्जदार हिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यावर व दोन्ही बाजूने सादर केलेले कागदपत्र पडताळून पाहील्यावर अर्जदार व गैरअर्जदार हे दोघेही अतिशय उच्च शिक्षीत असलयाचे दिसून येते. अर्जदार हिला नोकरी करायची ईच्छा असल्याने अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यात मतभिन्नत्ता उत्पन्न झाल्याने वाद उपस्थीत झाला असल्याचे दिसून येतो. या व्यतिरीक्त त्यांच्या वादाचे काही कारण उपलब्ध आहे, असे रेकॉर्डवरुन दिसून येत नाही. अर्जदार हिची वैद्यकीय देखभाल गैरअर्जदाराने योग्य प्रकारे घेतली असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यानंतर अर्जदार ही त्याच्या सहमतीविना माहेरी आल्यानंतर तिचा गर्भपात करण्यात आले असल्याचे स्पष्ट होते. या सर्व घटना घडत

असतांना कोणत्याही प्रकारचा कौटूंबिक हिंसाचार झाला होता, असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तर माहेरी येण्यास अर्जदारचा ओढा जास्त असल्याचा दिसून येतो. त्यानंतर सुध्दा तिने गैरअर्जदार सोबत जाण्यास नकार दिला असल्याचे दिसून येते.

६. अर्जदार हिने दाखल केलेला सदरचा अर्ज जर पाहीला तर २ मार्च २०२४ रोजी अर्ज दाखल असल्याचा दिसून येतो. तर गैरअर्जदार याने कल्याण येथील दिवाणी न्यायालयामध्ये ३१ ऑक्टोंबर २०२३ ला नांदायला येण्याविषयीचा अर्ज दाखल केला असल्याचे रेकॉर्डवरुन दिसून येते. कोणत्याही प्रकारचा शारीरिक अथवा मानसिक त्रास नसतांना पत्नीला नांदायला बोलावणे हा कौटूंबिक हिंसाचार ठरत नाही. जरी काही मतभेद असले तरी संबंधीत दिवाणी न्यायालयापुढे त्याचा निपटारा निश्चीतरित्या करण्यास संबंधीत न्यायालय सक्षम असतांना सदरचा अर्ज हा कोणत्याही चांगल्या कारणाशिवाय दाखल केला असल्याचा तर्क प्राप्त होतो. अर्जदार व गैरअर्जदार यांचे दरम्यान शारिरीक व मानसिक रित्या आघात करणारी कोणतीही गैरहरकत गैरअर्जदार यांनी केल्याचे प्रथमदर्शनी तर्क प्राप्त होत नाही. त्यामुळे अर्जदार ही स्वईच्छेने माहेरी राहत असलयाचे स्पष्ट होते.

७. अर्जदार ही उच्च शिक्षीत असून तिच्या वादाचे कारण स्वतः नोकरी करण्याची ईच्छा असल्याचे दिसून येते व तिला स्वतःच्या कर्तबदारीवर ठाम विश्वास असल्याचा दिसून येतो. त्यामुळे ती स्वतः ठामपणे सदरचा अर्ज प्रकरणामध्ये पुढील कार्यवाही पुर्ण करण्यास सक्षम असलयाचा तर्क प्राप्त होतो. गैरअर्जदार याने त्याच्या आर्थीक स्थीतीचे विवरण सादर

केलेले आहे. त्याची पण आर्थीक स्थीती उत्तम असून तो खावटी देण्यास पात्र आहे. परंतू सध्या उद्भवलेल्या स्थीतीला कोणत्याही प्रकारे तो जबाबदार आहे, हे स्पष्ट होवू शकलेले नाही. तरी पुरावा प्राप्त झाल्यावर त्याबाबत योग्य ते आदेश पारीत केले जावू शकतात. तुर्त अर्जदार हिने केलेल्या मागणी प्रमाणे तिला तुर्तातुर्त खावटी मिळण्यासारखी केस उपलबध आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्र.१ चे उत्तर नाही म्हणून देण्यात येते.

८. अर्जदार हिने सदरचा अर्ज हा प्रलंबीत असेपर्यंत तुर्तातुर्त खावटी मिळण्यासाठी दाखल केला असल्याचे दिसून येतो. अर्जदार हिच्याच कथनाप्रमाणे ती ०१ नोव्हेंबर २०२२ पासून आर्वी येथे वास्तव्यास आहे. तेव्हापासून अर्ज दाखल होईपर्यंत तिला कोणतीही अडचण उद्भवली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे तिची आर्थीक परीस्थीती चांगली असल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

अर्जदार हिचा तुर्तातुर्त खावटीचा अर्ज रद्द करण्यात येतो.

VIJAY RAMCHANDRA GHARAL

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2024.11.14 11:05:48 +0530

( व्ही. आर. घराळ )

ठिकाणीः आर्वी. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रे.

दिनांकः १२ नोव्हेंबर, २०२४. आर्वी, जि.वर्धा.